# सायकल रॅलीचे आयोजन

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) ३ जून या जागतिक सायकल दिनानिमित्त सायकल रॅलीचे आयोजन केले होते. मुंबईकरांना 'प्रदूषणमुक्त मुंबई' असा संदेश देत, विधानभवन मेट्रो स्थानक, मंत्रालयापासून ते आझाद मैदान येथे असलेले सीएसटी मेट्रो स्थानकापर्यंत सायकल रॅली काढण्यात आली. इंधनांचा कमी वापर करत, वाहतूक, सुरक्षितता आणि प्रदूषणमुक्त प्रवास हे या रॅलीचे मुख्य उद्दिष्ट होते. ही रॅली एमएमआरसीचे कार्यकारी संचालक आर. रमणा यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली. एमएमआरसीच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी या रॅलीमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.